जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ३३३ दिनांक - २२/०८/२०२४

मार्केटयार्ड पोलीस स्टेशन,पुणे शहर

# खुनाच्या गंभीर गुन्हयात जन्मठेपेची शिक्षा सुनावली असताना येरवडा कारागृहातुन पलायन केलेल्या आरोपीस केले जेरबंद

वारजे पोलीस स्टेशन गु.र.नं.३५/२०१५ भा.द.वि.क. ३०२, मधील आरोपी नामे राजु पंढरीनाथ दुसाने, वय ४३ वर्षे, रा मु.पो.महालगाव ता-वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर यास मा.अति सत्र न्यायालय पुणे सेशन केस क्रमांक ३४३/२०२५, दि.२४/०२/२०२४ रोजी जन्मठेप व दंड ५०००/- न दिल्यास ०३ महिने कारावासाची शिक्षा सुनावली असताना तो येरवडा खुले कारागृहातील कायदेशीर रखवालीतुन पळुन गेला होता.

सदर बाबत सविस्तर माहिती अशी की, दि.२१/०६/२०२४ रोजी भारत बंदच्या बंदोबस्ताच्या अनुषंगाने वरिष्ठांचे आदेशाने महिला पोलीस अंमलदार वेदपाठक,लोणकर,डोळसे हे शिवनेरी रोड ते वखार महामंडळ रोड अशी पायी पेट्रोलिंग करीत असताना मार्केट यार्ड गेट नं.१ जवळील रिक्षा जवळ एक इसम संशयीतरित्या उभा असलेला दिसुन आला.त्यावेळी महिला पोलीस अंमलदार वेदपाठक यांनी त्यांचे मोबाईलवरील व्हॉटसअपवर प्राप्त झाले फोटो मधील मिळत्या जुळत्या वर्णनाचा इसम दिसुन आला. त्यावेळी त्याचे जवळ जावुन त्यास त्याचे नाव गाव पत्ता विचारले असता तो उडवा-उडवीची उत्तरे देवु लागला व पोलीसांना घाबरुन पळुन जाण्याचा प्रयत्न करु लागला त्यावेळी त्यांनी सोबत असलेला स्टाफ सह थोडयाच अंतरावर जावुन त्यास ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन येथे आणले. व त्यांचेकडे सखोल चौकशी केली.त्यावेळी त्यानी त्याचे नाव राजु पंढरीनाथ दुसाने असे सांगितले. असे नावाचा आरोपी येरवडा कारागृह मधुन पळुन गेले असल्याचे व्हॉटसअप वर माहिती प्राप्त असल्याने लागलीच सदरच्या बातमीची खात्री करण्याकरीता येरवडा पोलीस स्टेशन येथे फोन करुन माहिती घेतली असता त्याचे विरुध्द येरवडा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.५३०/२०२४ बीएनएस २०२३ चे कलम २६२ गुन्हा दाखल आहे.व तो वारजे पोलीस स्टेशन गु.र.नं.३५/२०१५ भा.द.वि.क. ३०२,मधील आरोपी नामे **राजु पंढरीनाथ दुसाने,वय ४३ वर्षे,रा मु.पो.महालगाव ता.वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर** यास मा.अति सत्र न्यायालय पुणे सेशन केस क्रमांक ३४३/२०२५, दि.२४/०२/२०२४ रोजी जन्मठेप व दंड ५०००/- न दिल्यास ०३ महिने कारावासाची शिक्षा सुनावली असताना तो येरवडा खुले कारागृहातील कायदेशीर रखवालीतुन पळुन गेला म्हणुन गुन्हा दाखल केला आहे. आरोपीची वैदयकीय तपासणी करुन त्यास सुरक्षित येरवडा पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई, मा.अप्पर पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ०५ पुणे,श्री.आर.राजा, मा.सहा पोलीस आयुक्त,वानवडी विभाग श्री.धन्यकुमार गोडसे यांचे मार्गदर्शनाखाली मार्केट यार्ड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती माया देवरे यांचे आदेशाने महिला महिला पोलीस अंमलदार वेदपाठक,लोणकर,डोळसे यांनी केली.